आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ५ । पाने : ४ । मूल्य २ ₹



### जिल्ह्यातील एड्सग्रस्तांचा आकडा शून्याकडे

बीड : व्यापक जनजागृती आणि योग्य समुपदेशनामुळे बीड जिल्ह्यातील एचआयव्ही बाधित रूग्णांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊन आता शून्याकडे वाटचाल करत असल्याचे दिसत आहे. २००९-१० साली जिल्ह्यातील बाधितांचा टक्का ५.५ एवढा होता. आता तो घसरून केवळ ०.२९ वर आला आहे. जिल्हा रूग्णालयातील एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाने केलेली जनजागृती आणि रूग्णांचे समुदपदेशन करून केलेल्या उपचाराचे हे यश समजले जात आहे.

## सर्व पिढ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मार्गदर्शक : धनंजय मुंडे

▶ प्रतिनिधी



मुंबई : येणाऱ्या प्रत्येक पिढ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी केले. ते ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमात बोलत होते.

भारतीय संविधानाचे शिल्पकार प्रज्ञासूर्य, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दादर येथील चैत्यभूमीवर जाऊन कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व तेजस्वी विचार पिढ्यानपिढ्यासाठी मार्गदर्शक आहेत. समस्त बहुजन समाजाचे उध्दारकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून त्या विचारांवर चालण्याचा निर्धार करू असेही मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. सोमवारी देशभरातून आलेले अनुयायी अत्यंत शिस्त व नियमांचे पालन करून अभिवादन करत आहेत, त्या सर्वांना माझे नमन. मुंबई महापालिका प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक अनुयायांनी आज ऑनलाईन अभिवादन केले, त्या सर्वांचेही मनस्वी आभार, अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी सर्व अभिवादकांचे आभार व्यक्त केले आहेत. अभिवादनाच्या शासकीय कार्यक्रमास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, मुंबईचे पालकमंत्री अस्लाम शेख, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांसह मान्यवर उपस्थित होते.




बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# जिल्हाप्रमुखपदाचा तिढा सुटणार?

## शिवसेना पक्षप्रमुखांच्या निर्णयाकडे जिल्हावासियांचे लक्ष

▶ प्रतिनिधी

बीड : गुटखा तस्करी प्रकरणात कुंडलिक खांडे अडकल्याने त्यांच्या जागी नवा जिल्हाप्रमुख नियुक्त करणे जवळपास निश्चित झाले आहे. दरम्यान, शिवसेना बीड जिल्हाप्रमुख पदाचा तिढा लवकरच सुटणार आहे. अशी माहिती शिवसेनेच्या गोटातून प्राप्त झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनाप्रमुख कुंडलिक खांडे यांचाच बोलबाला होता. मात्र, गुटखा तस्करी प्रकरणामध्ये पोलिसांकडून मोठी कारवाई केल्यानंतर खांडे अडचणीत सापडले होते. खांडे हे या प्रकरणात दोषी आढळल्यानंतर त्यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली होती. मात्र, त्यामुळे आता बीड







जिल्ह्यात शिवसेना जिल्हाप्रमुख कोण?, असा प्रश्न उभा ठाकला आहे. शिवसेना जिल्हाप्रमुखपदासाठी जुन्या शिवसैनिकांची मुंबईवारी चालू झाली आहे. अनेक जण शिवसेना जिल्हाप्रमुख पदासाठी इच्छुक उमेदवार आहेत. मात्र आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे बीड जिल्ह्यासाठी कोणाच्या नावाला पसंती देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जिल्हाप्रमुखपदासाठी दिलीप गोरे, युद्धाजित पंडित, अनिल जगताप, बप्पासाहेब घुगे, परमेश्वर सातपुते ही नावे सध्या आघाडीवर आहेत. बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख पदाची जिल्ह्यासह संपूर्ण राजकीय वर्तुळातही मोठ्या प्रमाणात चर्चा रंगत आहे. कार्यकर्त्यांकडून अनेक उमेदवारांची नावे पुढे येताना पाहायला मिळतात. मात्र, बीड जिल्ह्यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख कोण होणार हा मोठा प्रश्न याठिकाणी निर्माण झालेला पाहायला मिळतोय. बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेबाबतीत अनेक शिवसैनिक पक्षासाठी झटून काम करणारे आहेत. मात्र यामधून कोणाची वर्णी लागणार याची सध्या चर्चा बीड जिल्ह्यामध्ये रंगू लागली आहे. कुंडलिक खांडे या प्रकरणानंतर या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यांमध्ये शिवसेनेकडून स्वच्छ प्रतिमा असलेला शिवसैनिक मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी गेल्या अनेक वर्षामध्ये शिवसेनेतील अनेक नावे चर्चेतही आहेत. एकेकाळी शिवसेनेचा आमदारही बीड जिल्ह्यात होऊन गेला होता. मात्र आता स्वच्छ प्रतिमा असलेला शिवसैनिक बीड जिल्ह्याला मिळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आता बीड जिल्ह्यातील या घडामोडींवर राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. मात्र शिवसेना पक्षप्रमुख काय निर्णय घेतात याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### कोरोना मृतांच्या नातेवाईकांना ५० हजारांचे सहाय्य

मुंबई : कोरोनाने मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकास ५० हजार रूपयांचे सानुग्रह सहाय्य देण्याचा निर्णय नुकताच राज्य सरकारने घेतला आहे. या शासन आदेशानुसार सरकारने ऑनलाईन संकेतस्थळ विकसित केले असून, याद्वारे कोरोना मृतांच्या नातेवाईकांना सानुग्रह मदत प्राप्त करुन घेण्यासाठी कमीत कमी कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल. यासाठी अर्जदाराने ाrहरर्लींळव१९ीशश्रळशष.ळप या वर लॉगिन करणे आवश्यक आहे. तसेच यासाठी https://epassmsdma.mahait.org/login.htm यावर देखील लिंक देण्यात आली आहे. अर्जदारास, त्याच्या आधार क्रमांक, मृत व्यक्तीचा , तपशील जसे मृत्यू प्रमाणपत्र आणि रूग्णालयाचा तपशील या कागदपत्रांच्या आधारे त्याचा स्वत:चा मोबाईल क्रमांक वापरून लॉगिन करता येईल.

### एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन उन्हात

बीड : आगारात सुरू असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला सोमवारी ३३ दिवस पूर्ण झाले आहेत. मध्यरात्री वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आंदोलन स्थळावरील मंडप हटविण्यात आल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन उन्हात सुरू आहे. कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या कारवाई नंतर एसटी कर्मचारी माघार घेतील अशी शक्यता होती. मात्र हा लढा आधिक तीव्र झाला आहे. बीड आगारातील कर्मचारी रविवारी सहकुटुंब आंदोलनात सहभागी झाले होते. तर यातील १८ कर्मचाऱ्यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्या केल्या आहेत. प्रशासनाने कितीही दबाव तंत्र वापरले तरी आम्ही विलीनीकरणाच्या मागणीवर ठाम असल्याचं कर्मचाऱ्यांनी पुन्हा स्पष्ट केलंय. तर कर्मचाऱ्यांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केलीय.

### जिल्हाधिकाऱ्यांची स्वाराती रूग्णालयाला भेट

अंबाजोगाई : कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनची धास्ती जिल्हा प्रशासनोही चांगलीच घेतली असून दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा हे विविध रूग्णालयांना भेटी देत आढावा घेत आहेत. रविवारी शर्मा यांनी स्वाराती रूग्णालय, लोखंडी सावरगाव येथील रूग्णालय व केज उपजिल्हा रूग्णालयाला भेट देत आढावा घेतला.

## राजेवाडी शाळेतील शिक्षीका, मुख्याध्यापक निलंबीत

▶ प्रतिनिधी

बीड : मुख्याध्याापक आणि शिक्षीकेच्या वादातून राजेवाडी (ता.माजलगाव) येथील शाळा चार दिवस बंद होती. या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्या समोरी सोमवारी सुनावणी झाली. यावेळी अजित पवार यांनी मुख्याध्यापक जिंकलवाड व शिक्षीका राठोड या दोघांनाही निलंबीत करत प्रत्येकी दहा हजार रुपयांचा दंड केला. तसेच शाळेवर दोन शिक्षकांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले.

राजेवाडी येथील शाळेवर कार्यरत असलेले मुख्याध्यापक शिवाजी जिंकलवाड व सहशिक्षीका संगीता राठोड यांच्यातील वादामुळे चार दिवसांपासून शाळा बंद होती. या प्रकरणात गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही. यादरम्यानच राठोड यांनी शाळेतच विष प्राशन केल्याचा प्रकार घडला. तसेच रविवारी तालखेड फाट्यावर मुख्याध्यापकाच्या निलंबनासाठी रास्तारोको आंदोलनही करण्यात आले होते. शाळेतील शिक्षकांच्या वादाला एव्हढे मोठे स्वरुप मिळाल्याने हा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून शिक्षणाधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्या निर्देशानुसार या दोघांनाही सोमवारी सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले होते. त्यानुसार सोमवारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्यासमोर सुनावणी झाली. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेत पवार यांनी दोघांनाही निलंबीत करण्याचे आदेश दिले. तसेच जिल्हा परिषदेची बदनामी केली म्हणून प्रत्येकी दहा हजार रुपयांचा दंडही केला. यावेळी ग्रामस्थ, सरपंच यांचीही उपस्थिती होती. दरम्यान, राजेवाडी येथील शाळेवर तात्काळ दोन शिक्षकांची प्रतिनियुक्ती करावी अशा सूचना केल्याचे शिक्षणाधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांनी सांगितले.

### अभिवादन!



माजलगाव : तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट येथे देखिल विश्व वंदनीय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, सीईओ शहाजी शेजुळ, अनंत शेंडगे, अशोक मगर, 'वर्तमान'चे संपादक भगीरथ तोडकरी, सचिन पट्टेकर, कर्मचारी वृंद आदी.

## संघमित्रा अर्बनची सामाजिक बांधिलकी

## वर्धापनदिनानिमित्त लसीकरण, रक्तदान शिबिराचे आयोजन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सहकार क्षेत्रात अल्पावधीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या संघमित्रा अर्बनने वर्धापनदिनानिमित्त कोविड लसीकरण आणि रक्तदान शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकीचा वसा घेतला आहे.

येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या व अल्प कालावधित सभासद, खातेदारांच्या विश्वास पात्र ठरलेल्या संघमित्रा अर्बनचा चौथा वर्धापन उत्साहात साजरा झाला. यावेळी संघमित्रा अर्बनच्या वतीने घेण्यात आलेल्या कोविड लसीकरण शिबीरात १२१ जणांनी लसीकरणाचा लाभ घेतला, तर रक्तदान शिबिरात ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष घनघाव, सचिव संजय बजाज, संचालक डॉ.बालाजी घनघाव यांना शहरातील विविध राजकिय नेते, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, पत्रकार बांधवांनी भेट देवून शुभेच्छा दिल्या.

माजलगाव शहरातील नविन बसस्थानकासमोरील खुर्पे कॉम्लेक्समध्ये असलेल्या संघमित्रा अर्बनचा चौथ्या वर्धापन दिनानिमित्त रविवार,दि. ०५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रक्तदान व कोविड लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.




कोविड लसीकरण व रक्तदान शिबीराचे उद्घाटन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले तर दीपप्रज्वलन माजलगावच्या तहसिलदार वर्षा मनाळे यांनी केले. यावेळी कोविड लसीकरण शिबीराचा १२१ लाभार्थ्यांनी लाभ घेतला तर रक्तदान शिबीरात ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी संघमित्रा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष घनघाव, सचिव संजय बजाज व संचालक डॉ.बालाजी घनघाव यांना भेट देऊन संस्थेच्या यशस्वी वाटचालीबद्दल विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघमित्रा अर्बनचे संचालक भागवत हजारे, सौ.शशिकला राठोड, सौ.गंगुबाई धुमाळ, अय्युब आत्तार, शाहुराव सातपुते, प्रकाश खिस्ते, सुनिल बुरंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी जस्विन घनघाव, व्यवस्थापक संदिप सावंत, सतिष वगरे, इम्रान तांबोळी, कैलास शिंदे, बाबासाहेब घनघाव, अभिजीत चौरे, भारत घनघाव, अनिल भराटे व विशाल घनघाव आदींनी परिश्रम घेतले.

### संस्थेचा राष्ट्रीय कार्यास हातभार : वर्षा मनाळे

संघमित्रा अर्बनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त विविध शासकीय कार्यालयात ५० कचराकुंडीचे वाटप करत कोविड लसीकरण व रक्तदान शिबिर आयोजित केले. विविध सामाजिक उपक्रम राबवून संस्थेने राष्ट्रीय कार्यास हातभार लावला असल्याचे मत तहसिलदार वर्षा मनाळे यांनी यावेळी व्यक्त केले.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

## संपादकीय

# ऋतुचक्र कूस बदलते तेव्हा...

बदलते हवामान रोगाला आमंत्रण देणारे ठरत आहे. का ऋतुने कूस बदलली आहे. याविषयी तज्ज्ञ अभ्यास करत आहेत. डिसेंबर महिन्याला सुरूवात झाली आहे. आजवरच्या ऋतुचक्राप्रमाणे या कालावधीत हिवाळा असतो. मात्र, गेल्या चार दिवसांपासून राज्यात तुरळक प्रमाणात पाऊस पडत आहे. त्याच्या जोडीला अंधुक प्रकाश आणि ढगाळ वातावरण आहे. ऋतुचक्र वेगाने बदलते आहे. यंदा पुण्यासह मुंबई या प्रमुख शहरांनी वर्षभर पाऊस अनुभवला आहे. दक्षिण भारतात वाढलेला पाऊस आणि त्याचवेळी युरोपीय देशांकडे निर्माण होणारी वातावरणीय स्थिती यांचा एकत्रित परिणाम म्हणून मुंबईत डिसेंबरच्या प्रारंभीही पावसाने हजेरी लावली. वर्षभरातील पर्जन्यमानाचा विचार केल्यास २०२१ वर्षाची सुरुवात पावसाने झाली. ऋतू विभागणीनुसार, मुंबईकर गुलाबी थंडीची प्रतीक्षा करत असताना ८ जानेवारीला सकाळीच पावसाने हजेरी लावली. पुढील दोन दिवसही पाऊस पडला. पुढे मुंबई उपनगरात १९ फेब्रुवारी, त्यानंतर मार्च, एप्रिलमध्येही हलक्या सरी पडल्या. मे महिन्यात तौक्ते चक्रीवादळामुळे मुंबई शहर व उपनगरांत अनेक ठिकाणी पाऊस पडला. त्यामुळे यंदा मुख्य पावसाळा म्हणजे मोसमी पाऊससुरू होण्यापूर्वीच मुंबईत अडीचशे मिलिमीटरहून अधिकपाऊस झाला होता. मान्सून काळात दमदार पाऊस अपेक्षित असतो. त्याप्रमाणे वरूणराजाची बरसात झाली. ऑक्टोबरमध्ये मोसमी पाऊस परतला. मात्र, त्यानंतरही पावसाने उसंत घेतलेली नाही. प्रामुख्याने नैऋत्य मोसमी पाऊस हा जून ते सप्टेंबर या कालावधीत असतो; परंतु युरोपीय देशांकडे निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यांचा परिणाम भारतातील काही भागांवरही होतो. युरोपीय देशांमध्ये निर्माण होणारी ही वातावरणीय स्थिती ऑक्टोबर ते एप्रिल–मे या कालावधीत अधिक सक्रिय असते. या स्थितीचा परिणाम प्रामुख्याने उत्तर भारतावर होतो. काही वेळा मध्य भारतावरही युरोपीय वाऱ्यांचा परिणाम होत असल्याने सप्टेंबरनंतर आणि जूनच्या आधीही मुंबईत तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम सरी बरसतात. नैऋत्य मोसमी पावसाच्या कालावधीत दक्षिण भारतात तुलनेने पाऊस कमी असतो. याउलट मुंबईचा पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात आग्नेय मोसमी पाऊस दक्षिण भारतात अधिक सक्रिय असतो. बंगालच्या उपसागरात निर्माण होणारे कमी दाबाचे पट्टे अरबी समुद्राकडे सरकतात. हे पट्टे आर्द्रता घेऊन येतात. त्यामुळे महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पाऊस पडतो. निसर्गात ऋतूनिहाय फळ, फुले आणि भाजीपाला उपलब्ध होत असतात. यामुळे त्या–त्या मोसमात त्याचा आस्वाद घेण्याची मजा औरच असते. याप्रमाणेच ऋतूनिहाय फुलणाऱ्या फुलांनाही तेवढेच महत्त्व आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून वातावरणात झालेल्या बदलाने प्रत्येक ऋतू जवळपास एक ते दीड महिने उशिराने येत असल्याचे चित्र आहे. याचे उदाहरण म्हणजे साधारणत: जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान पडणारा पाऊस आता वेळेत येत नाही. शिवाय हिवाळ्यातील थंडीही सुरू होण्याच्या महिन्यात बदल झाला आहे. साधारणत: हिवाळा हा ऋतू लीली, शेवंती, कॅलेंडूला, गुलाब, झिनिया यांसारख्या फुलांचा फुलण्याचा काळ असतो. मात्र, गेल्या दोन वर्षात थंडीची चाहूल जरा उशिराच लागत असल्याने या झाडांना कळ्या येऊनही त्या फुलत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पडणारी थंडी डिसेंबरच्या सुरुवातीच्या आठवड्यात सुरू झाल्याने गार्डनमध्ये असलेल्या या फुलांच्या झाडांना अद्याप फुलेच आली नाहीत. ऋतुचक्रातील बदल हीच ग्लोबल वॉर्मिंगची खरी सुरुवात आहे. कोणताही विचार आणि नियोजन न करता होत असलेले नागरीकरण अवकाळी किंवा बिगर मोसमी पावसाला कारणीभूत ठरले आहे. शहरे वसवण्याच्या नावाखाली निसर्गाचा तोल बिघडविण्याचे काम माणसाने हाती घेतले, त्याला आता शेकडो वर्षे होऊन गेली आहेत. पण गेल्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आणि या शतकाच्या प्रारंभी मनुष्य जातीने उन्मादात वावरून निसर्गाचा तोल बिघडविण्याचेच नव्हे, तर निसर्गालाच बिघडविण्याचे काम हाती घेतले आहे. नदी, नाले, टेकड्या, झाडे, हवा, पाणी या सर्व गोष्टींचा आपल्या मनासारखा वापर करण्याची स्पर्धाच या शहरांमध्ये लागली आहे. मनमुराद जगण्यासाठी समोर असलेली प्रत्येक गोष्ट ओरबाडून घेण्याच्या वृत्तीने आता टोक गाठले आहे. त्याचेच परिणाम आपल्या सगळ्यांना आता थेट जाणवू लागले आहेत. पूर्वी आठ जूनला पाऊस यायचा आणि आज्ञाधारक मुलासारखा सप्टेंबरअखेर पुरेसे पाणी देऊन जायचा. ऑक्टोबरमध्ये उकाडा वाटून नोव्हेंबरमध्ये छान थंडी पडायची. पण आता हे चित्र वेगाने बदलले आहे. आता पाऊस महिनाभर रेंगाळत येत नाही, तो कधी तरी एक–दोन दिवस येतो. उपकार एवढेच की, या दोन दिवसांमध्ये तो आपले काम पूर्ण करतो. रागावल्यानंतरही तो कर्तव्यात चुकत नाही. पुरेसे माप नादान मानवाच्या कल्याणासाठी त्याच्या पदरात टाकतो. पण आता माणूस इतका उन्मत्त झाला आहे की, त्याला या उपकाराची जाण राहिलेली नाही. त्याच्या येण्यामध्ये आणि वाहण्यामध्ये अडथळे उभे करण्याचे काम त्याने हाती घेतले आहे. खरा धोका तोच आहे. सवयीनुसार माणूस बेफिकिरीनेच वागत राहील, कारण स्वत:ला किंवा जवळच्या व्यक्तीला फटका बसत नाही तोपर्यंत त्याची संवेदना जागृत होणार नाही. हे ऋतुचक्र बिघडविण्यासाठीच तो धडपड करील आणि त्यातूनच स्वतःचा नाश ओढवून घेईल. आपल्या ऱ्हासासाठी तो स्वतः जबाबदार असेल; नाव मात्र तो निसर्गाला ठेवेल इतकेच. बदलेल्या ऋतुचक्राने नियम बदलायला लावलेत हे निश्चित!

# क्लार्ट ॲप जलसंकटावरील वरदान

**पर्यावरणावर काम करणाऱ्या 'फाउंडेशन फॉर इकॉलॉजीकल सिक्युरिटी ' या भारतीय संस्थेनं 'क्लार्ट' नावाचं एक ॲप आणलंय. नीती आयोगाच्या आकडेवारीनुसार भारतातल्या ६० कोटी लोकांना पाण्याचं संकट सतावत असल्याचं म्हटलंय. अशावेळी जल संवर्धनाची इत्यंभूत माहिती देण्यासोबत आपल्यावर त्याची जबाबदारी टाकणारा हा 'क्लार्ट ॲप' वरदान ठरू शकेल. क्लार्ट ॲप काय आहे प्रणाली यावर इत्यंभूत माहिती देणारा लेख 'वर्तमान'च्या वाचकांसाठी देत आहोत.**

पावसाळा म्हटलं की किती मजा असते नाही? पाणीच पाणी. हवं तेवढं उपसा. पण पावसाळा सरून गेला की मग? पाण्याचे साठे हळूहळू कमी व्हायला लागतात. पाण्यासाठी दूरपर्यंत पायपीट करावी लागते. टँकर मागवावे लागतात. लोकांची झुंबड उडते. या पाण्याच्या संकटामुळे होणारे राजकीय संघर्ष, गावागावांमधले तंटेही आपण ऐकले असतील. आजही भारतातल्या अनेक ग्रामीण भागात पावसाळा निघून गेला की माणसांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. मराठवाडा, विदर्भातल्या दरवर्षीच्या बातम्या आपल्याला नव्या नाहीत. हीच पाण्याची समस्या सोडवण्यासाठी म्हणून एक ॲप आलंय. थोडं आश्चर्यचकित व्हाल पण 'क्लार्ट' नावाचं हे भारतीय ॲप पाण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे.

भारतीय संस्थेनं बनवलंय 'ॲप'

'फाउंडेशन फॉर इकॉलॉजीकल सिक्युरिटी' अर्थात एफइसी या संस्थेची स्थापना २००१ला गुजरातमधे झाली. पर्यावरण, जैवविविधता आणि जमीन, जंगल, आणि पाण्याचं संवर्धन करणं, ग्रामीण भागाला जोडून घेणं, त्यासाठी सामूहिक प्रयत्न करणं अशाप्रकारे या संस्थेचं काम चालतं. गुजरातसोबत, आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओडीसा, मध्यप्रदेश या भागांमधे या संस्थेचं काम उभं राहतंय. तर दुष्काळी भागातही संस्था काम करतेय. या संस्थेनं आजच्या घडीला ३५,२५१ गावांमधली ९.१२ मिलियन एकर जमीन भूमिहीनांना मिळवून दिलीय. त्यातून १६ मिलियन लोकांना फायदा झाल्याची माहिती संस्थेच्या वेबसाईटवर वाचायला मिळते. ग्रामीण भागाशी कनेक्ट वाढावा यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. त्यासाठी भारत आणि भारताबाहेरच्या अनेक प्रतिष्ठित युनिवर्सिटीची मदत अभ्यासासाठी म्हणून घेतली गेलीय. त्याची दखल घेत 'युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन टू कॉम्बॅट डेजर्टिफिकेशन'सारखे पुरस्कार संस्थेला मिळालेत. जल, जमीन, जंगल शाश्वत असं काम उभं करताना एफइसीनं कृतिशील होण्याच्यादृष्टीनेही पावलं उचलली आहेत. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणजे संस्थेनं आणलेला 'क्लार्ट' नावाचा ॲप. ग्रामीण भागातल्या पाण्याच्या संकटावरचं हे एक महत्वाचं पाऊल असल्याचं





संस्थेचं म्हणणं आहे.

'क्लार्ट'चं काम कसं चालतं?

उकाडा सुरू झाला की भारतातल्या अनेक भागात पाण्यासाठी वणवण करावी लागते. मैलोनमैल चालावं लागतं. या सगळ्यात मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातल्या महिलांची फरपट होते. खोदकाम केलं जातं पण पाणी लागत नाही. हे सगळं लक्षात घेऊन एफइसीनं २०१४ला 'क्लार्ट' हे ॲप बनवलं. अपडेट केल्यामुळे त्यात नव्याने काही गोष्टी ॲड करण्यात आल्या आहेत. 'क्लार्ट'मुळे आपल्या आसपास पाण्याचा शोध घेणं शक्य होईल. पाण्याचा अंदाज येईल. शिवाय पाणी साठवून ठेवता येईल. आसपास पाण्याचा शोध लागल्यामुळे माणसांचा कित्येक किलोमीटरचा प्रवास वाचेल असं संस्थेचं म्हणणं आहे. 'हा ॲप ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारे काम करू शकतो. यात कलर कोडिंगचा उपयोग केल्यामुळे ग्रामीण भागातल्या कमी शिकलेल्या लोकांनाही तो सहज वापरता येईल.' असं संस्थेच्या चिरनजीत गुहा यांनी डीडब्ल्यू वेबसाईटला म्हटलंय. हे ॲप मोफत आहे. त्यामुळे भारतातल्या १९ राज्यांमधल्या ग्रामीण भागात पावसाच्या पाण्याची

**आज-काल**

**अक्षय शारदा शरद**

साठवणूक करणं शक्य झालं. आणि पुढे त्या पाण्याचा इतर कामांसाठी पुनर्वापरही करता आला. एखाद्या ठिकाणी गेलात आणि हे ॲप ओपन केलंत तर तिथल्या पाण्याच्या स्थितीविषयीची सगळी माहिती हा ॲप देऊ शकेल. त्यामुळे या 'क्लार्ट'नं गावातल्या जलसंधारणाची जबाबदारी थेट गावकऱ्यांवर सोपवलीय असंच म्हणता येईल.

आकड्यांपेक्षा जलसंकट सतावतंय

जागतिक तापमानवाढ, हवामान बदल, जैवविविधतेला वाढत असलेला धोका हे सगळे बदल आपल्या जीवाशी येणार आहेत. अचानक येत असलेली वादळं, वाढती गर्मी, पूर, पाऊस ही संकटं आपल्याला या सगळ्याची चाहूल देतायत. ग्लास्कोतली हवामान परिषदेत यावर चर्चा झाली. त्यावर विधायक, कृतिशील काही होण्याची गरज आहे. नाहीतर हे संकट अधिक वाढेल. भारतात मोठ्या प्रमाणात जल संकट आहे. त्याचाच भाग म्हणून केंद्रीय जलशक्ति खात्याने २०१९ला राष्ट्रीय जल अभियानाची सुरवात केली. देशातल्या २५६ जिल्ह्यांमधल्या १५५९ ठिकाणी हे अभियान पोचलं. २०२०मधे देशातल्या ६२३ जिल्ह्यांमधे पाण्यासंबंधी जनजागृती व्हावी म्हणून 'कॅच द रेन' हे अभियानही राबवलं गेलं. २०२४ पर्यंत केंद्र सरकारला भारतातल्या ग्रामीण भागातल्या प्रत्येक घरात नळाचं पाणी पोचवायचं आहे. सरकार असे काही प्रयत्न करत असताना नेमकी वस्तुस्थिती काय आहे? 'वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिटयूट' या संस्थेच्या २०१९च्या आकडेवारीनुसार भारत हा जगातल्या अशा १४ देशांमधे मोडतो जिथं पाण्याची कमी आहे. तर केंद्र सरकारचा थिंक टँक असलेल्या नीती आयोगानं भारतातल्या ६० कोटी लोकांना पाण्याचं संकट सतावत असल्याचं म्हटलंय. लोकप्रिय घोषणांपेक्षा हे आकडे अधिक धक्कादायक आहेत.

क्लार्टची शेतकऱ्यांना मदत

हवामान बदलांसारख्या संकटांमुळे ऋतूंचं पूर्ण चक्र पालटतंय. त्याचा आपल्या जलस्त्रोतांवर परिणाम होतोय. कधीकधी हवामानविषयक तज्ज्ञांचे अंदाजही चुकतात. पाण्यावर पुन्हा प्रक्रिया करून त्याचा वापर आपल्याला करता येऊ शकेल. किंवा ते साठवताही येणं शक्य होईल. त्यासाठी वेगवेगळे प्रयोगही केले जातात. हा बदललेल्या परिस्थितीचा फटका हा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसतोय. क्लार्ट हा ॲप शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. 'कॉटन कनेक्ट' विवेक देशमुख शाश्वत शेतीला सातत्याने प्रोत्साहन देत असतात. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीमधे चढउतार येत असताना हा 'क्लार्ट ॲप' क्लार्ट ॲप' शेतकऱ्यांना फायद्याचा ठरेल असं डीडब्ल्यूशी बोलताना त्यांनी म्हटलंय. जिथं पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असतं तिथं आजही मोठ्या प्रमाणात त्याची नासाडी केली जाते. त्यामुळे रिसायकलचं चक्र त्यामुळे बिघडतं. अशावेळी या सगळ्यावर लक्ष ठेवण्यासाठी आणि आपली जलसंधारणाची जबाबदारी वाढण्याच्या दृष्टीने हे ॲप महत्वाचं ठरणार आहे. ■

# हवा प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार 'हवा'

**दिल्लीतलं प्रदूषण गंभीर झाल्यामुळे लॉकडाऊनच्या पर्यायाचा विचार सुरू आहे. हा इशारा ओळखून इतर शहरातल्या नागरिकांनी सुज्ञपणे वागायला हवं. हवेच्या प्रदूषणामधे महत्त्वाची भूमिका असणारी संसाधनं मर्यादित असली, तरी जगाचा विनाश होईल इतकं प्रदूषण करायला सक्षम आहेत. त्यामुळे त्यांचा वापर नियंत्रणात आणणं महत्त्वाचं आहे.**

लॉकडाऊन' हा शब्द आता सर्वसाधारण बनला आहे. कोरोनामुळे तो इंग्रजी शब्द न राहता सर्वभाषिक झाला. कोरोनाच्या पहिल्या लाटेला नियंत्रणात ठेवण्यासाठी जगभरातल्या बहुतांश देशांत लॉकडाऊन करण्यात आलं. परिणामी, प्रदूषणाच्या पातळीत मोठी घट झाली. मागच्या शंभर वर्षात न दिसलेली हिमशिखरं अति दूरवरून दिसू लागली. कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही प्रदूषित राहिलेल्या नद्या पूर्वीप्रमाणेच स्वच्छ जलधारा घेऊन वाहू लागल्या. पशु–पक्ष्यांना मुक्तसंचार परवाना मिळाला. गाड्या आणि कारखाने बंद ठेवले तर काय चमत्कार होऊ शकतो, हे याची देही, याची डोळा' या पिढीला पाहायला मिळालं. याच काळात पृथ्वीच्या वातावरणातल्या ओझोन थराला धोका निर्माण झाला होता. मात्र लॉकडाऊन असल्याने प्रदूषणात मोठी घट झाली. वातावरणातल्या प्रदूषक घटकांचं प्रमाण वाढलं की ओझोन थर पातळ होतो. दक्षिण ध्रुवाजवळ दरवर्षी असं छिद्र पडतं आणि प्रदूषण पातळी कमी आली की बुजतं. २०२०मधे पहिल्यांदा १० लाख चौरस किलोमीटरचं छिद्र उत्तर ध्रुवाजवळ पडलं. या घटनेनं पर्यावरण अभ्यासक चिंतेत पडले होते. मात्र लॉकडाऊनमुळे प्रदूषणाची पातळी घटली. परिणामी, हे छिद्र हळूहळू बुजलं. कोरोनाच्या संकटामुळे झालेल्या लॉकडाऊनने, पृथ्वीवरचं विनाशकारी संकट टळलं.

एअर क्वालिटी इंडेक्सचं गणित

दरवर्षी ऑक्टोबर – नोव्हेंबरमधे दिल्लीतल्या हवेचा दर्जा घसरतो. यामागे अनेक कारणं आहेत. दिल्लीच्या हवेचा दर्जा सुधारावा या मागणीसाठी न्यायालयामधे जनहित याचिका दाखल होतात. काही वेळा न्यायालय स्वत:च याबाबत कार्यवाही सुरू करतं. भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल खात्याच्या अखत्यारीतल्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईटवरच्या मानकांनुसार एअर क्वालिटी इंडेक्स अर्थात एक्यूआय आणि त्याचे शरीरावर होणारे परिणाम पाहिले



की याचं गांभीर्य लक्षात येतं. हा गुणांक ० ते ५० असल्यास ती हवा चांगली मानली जाते. अशा हवेचे मानवी शरीरावर कमीत कमी अनिष्ट परिणाम होतात. ५१ ते १०० पर्यंत गुणांक असल्यास हवा समाधानकारक मानली जाते. अशा हवेत श्वसनाचे किरकोळ त्रास उद्भवू शकतात. गुणांक १०१ ते २०० असल्यास हवा मध्यम दर्जाची मानतात. श्वसन, दमा, हृदयरोग रुग्णांना श्वसन सुरळीत न होऊन अस्वस्थता निर्माण होते. हाच गुणांक २०१ ते ३०० च्या दरम्यान असल्यास हवा खराब दर्जाची मानली जाते. या हवेमधे जास्त काळ राहिल्यास निरोगी माणसालाही श्वसनाचा त्रास होतो. ३०१ ते ४०० गुणांक असणारी हवा आणखी खराब मानली जाते. अशा हवेमधे श्वसनाचे दीर्घकालिक त्रास उद्भवतात. ४०१ ते ५०० गुणांक असणारी हवा अतिशय खराब असते. या हवेत निरोगी माणसं आजारी पडतात आणि आजारग्रस्त लोकांचा मृत्यूची शक्यता वाढते.

**विशेष**

**डॉ.व्ही.एन.शिंदे**

दिल्ली प्रदूषणावर न्यायालयात सुनावणी

हवेचा दर्जा तपासणारी एकट्या दिल्लीमधे एकूण ४० केंद्रं आहेत. या सर्व केंद्रांमधे हवेचा दर्जा गुणांक हा ३०० पेक्षा जास्त आहे. दिल्लीजवळ असणाऱ्या केंद्रानेही हा गुणांक चारशेपेक्षा जास्त दर्शवलाय. दिल्लीच्या आजूबाजूच्या परिसरात साधारण हीच परिस्थिती आहे. मागच्या काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालयात या मुद्द्यावर सुनावणी सुरू आहे. यामधे न्यायालयाने अगदी सुरवातीलाच हवेचं प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी लॉकडाऊनसारख्या पर्यायाचा विचार करावा, असं सुचवलं. दिल्ली सरकारने यापूर्वी प्रदूषण कमी करण्यासाठी सम–विषम गाड्यांच्या वापराचा पर्याय अवलंबला होता. आता मात्र पूर्ण लॉकडाऊनच्या पर्यायाचा विचार सुरू आहे. हे चित्र अतिशय भयानक आहे. हवेमधे विशिष्ट मात्रेपेक्षा कार्बन मोनॉक्साईड, कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड, ओझोन आणि इतर प्रदूषणकारी घटकांचं प्रमाण जास्त झाल्यास हवा प्रदूषणकारी मानली जाते. यातल्या बहुतांश घटक दगडी कोळशाच्या ज्वलनापासून मोठ्या प्रमाणात हवेत मिसळतात.

दुसरं कारण म्हणजे गाड्यासाठी वापरलं जाणारं डिझेल, पेट्रोलसारखी खनिज तेल. दिल्लीमधे सर्वाधिक औष्णिक विद्युत केंद्रं आहेत. या सर्व केंद्रांमधे मोठ्या प्रमाणात दगडी कोळशाचा वापर करण्यात येतो. गाड्यांची संख्याही मोठी आहे. असं असतानाही सुनावणीवेळी आजूबाजूच्या परिसरात शेतकरी शेतामधे पिकांचं पाचट आणि इतर जैविक कचरा जाळत असल्याने प्रदूषण वाढत असल्याचा दावा केला. मात्र, या विषयावर गंभीर असणाऱ्या न्यायाधीशांनी या दाव्यासाठी पुरावे मागितले आणि पुढच्या सुनावणीवेळी या प्रदूषणामधे शेतकऱ्यांच्या कृतीमुळे होणारं प्रदूषण केवळ ४ ते ७ टक्के असल्याचं निदर्शनास आणून दिलं.

इतर शहरांमधलं वाढतं प्रदूषण

दिल्लीमधे प्रदूषण कमी करण्यासाठी खरोखरच लॉकडाऊनचा पर्याय अवलंबावा लागण्याची चिन्हं दिसत आहेत. अशीच परिस्थिती भारतातल्या अनेक शहरांची आहे. बिहारमधल्या मोतीहारी भागातल्या हवेचा गुणांक ३१७, तर पाटण्यामधे ३१९ आहे. गुजरातमधल्या अहमदाबाद शहरात २०० पेक्षा जास्त आहे.

हरियाणातल्या चारखी बाद्री गावात हवेचा दर्जा गुणांक ४०० पेक्षा जास्त आहे. इतर शहरांतही तो तीनशेपेक्षा जास्त आहे. मध्य प्रदेशातल्या भोपाळ शहरातला गुणांक ३०४, तर कटनी भागात ३०० च्या जवळ आहे. महाराष्ट्रात मुंबई शहरातले काही भाग असेच प्रदूषित झाले आहेत. कुलाबा भागातल्या केंद्रामधे हवेचा दर्जा गुणांक हा ३६३ आहे. तर वरळी, सायन भागातला हा गुणांक २७५ च्या जवळ आहे. पुण्यातल्या कोथरूड भागातला गुणांक २६९ आहे. राजस्थानमधल्या शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या कोटा गावातला गुणांक तीनशेपेक्षा जास्त आहे. उत्तर प्रदेशातल्या अनेक शहरांमधली परिस्थिती अशीच आहे. हे आकडे केंद्र शासनाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईटवरचे १६ ऑक्टोबर, २०२१चे आहेत.

हवेचं प्रदूषण करणारी संसाधनं

हवेचं प्रदूषण हा दिवसेंदिवस गंभीर मुद्दा बनत चालला आहे. या विषयावर जागतिक पातळीवर चर्चा सुरू आहे. कोळशाचा वापर पूर्णत: बंद करण्याचा प्रस्ताव चर्चेला आला. इंधन तेलाच्या वापरावरही मर्यादा आणण्याची चर्चा सुरू आहे. एखाद्या देशात प्रतिमाणशी किती ऊर्जा वापरली जाते, यावर त्या देशाची प्रगती मोजली जाते. हळू आणि शाश्वत प्रगतीपेक्षा वेगाने प्रगती करण्यासाठी त्वरेने जास्तीत जास्त ऊर्जा मिळवण्यावर अनेक राष्ट्रांनी भर दिला. त्यासाठी दगडी कोळसा आणि इंधन तेलांचा अमर्याद वापर सुरू झाला कारण त्यांची सहज उपलब्धता हे आहे. आज खनिज तेल उत्पादक देश जगाला आपल्या तालावर नाचवत आहेत. हवेच्या प्रदूषणामधे महत्त्वाची भूमिका असणारी ही संसाधनं मर्यादित असली, तरी जगाचा विनाश होईल इतकं प्रदूषण करायला सक्षम आहेत. त्यामुळे त्यांचा वापर नियंत्रणात आणणं महत्त्वाचं आहे.

तर आपल्यासाठीही दिल्ली दूर नाही

हवेचं प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी काही उपाय तातडीने अंमलात आणावे लागतील. यात सर्वात महत्त्वाची भूमिका असेल ती सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था भक्कम करण्यासाठी शहरांमधे बसेसची संख्या पुरेशी असणं आणि त्या प्रवाशांना वेळेत मिळतील, हे पाहायला हवं. ही व्यवस्था माफक दरात उपलब्ध व्हायला हवी. अनेक शहरांमधे मेट्रो प्रकल्प उभारले आहेत. मात्र मेट्रोपेक्षा लोकांना स्वत:च्या गाड्या वापरणं परवडतं. नेमकं हेच आपल्याला दिल्लीत पाहायला मिळतं. दिल्लीतल्या मेट्रोचे दर सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत.

मुंबईमधली लोकल व्यवस्था जर चांगली नसती, तर दिल्लीअगोदर मुंबईमधली प्रदूषणाची समस्या बिकट बनली असती. आज दिल्लीतलं प्रदूषण गंभीर झाल्यामुळे लॉकडाऊनच्या पर्यायाचा विचार सुरू आहे. हा इशारा ओळखून इतर शहरांतल्या नागरिकांनी सुज्ञपणे वागायला हवं. जिल्हास्तरीय ठिकाणांमधे कोल्हापूर वर्षाच्या सरासरी प्रदूषण गुणांकामधे पहिल्या २०मधे येतं. आपापल्या भागातल्या प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. नाहीतर दिल्लीसारखी परिस्थिती आपल्या शहरातही उद्भवू शकते.

# विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'दीपपर्व'चे स्वागत












बीड : राजकारण, समाजकारण, क्रिडा आणि प्रशासनातील दिग्गज मान्यवरांनी 'वर्तमान'च्या 'दीपपर्व २०२१'चे दर्जा आणि गुणवत्तेबद्दल स्वागत केले आहे. यात माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष तथा भाजपा नेते मोहन जगताप, भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचे कर्णधार ज्योतीराम घुले, बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव सिरसाट, राष्ट्रवादीचे नेते जयदत्त नरवडे, बेटर बी राईट बिझनेस सोलुशन्सचे संचालक तथा बडा बिझनेस प्रायव्हेट लिमिटेडचे चॅनल पार्टनर शिवहरी यादव, बीड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, बीडचे अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त सय्यद इम्रान हाश्मी, बीडचे शिक्षणाधिकारी डॉ.विक्रम सारूक, चाटगाव ग्रामपंचायचे उपसरपंच तथा भाजपा नेते बालासाहेब केकान, सामाजिक कार्यकर्ते दीपक गडसिंग आदींना दिवाळी अंक भेट देण्यात आला.

## माजलगावचे ग्रामदैवत श्री खंडोबा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

▶ प्रतिनिधी





माजलगाव : दरवर्षीप्रमाणे यावर्षी ग्रामदैवत श्री खंडोबा मंदिरात २ डिसेंबरला घटस्थापना करण्यात आली. यानिमित्त आयोजकांकडून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे, अशी माहिती संयोजक तथा देवस्थानचे पुजारी सुनिल चौरे यांनी दिली.

माजलगाव शहरातील पुरातन श्री खंडोबा मंदिर हे जागृत देवस्थान आहे. भाविकभक्तांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. चंपाषष्टीनिमित्त दरवर्षी मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी गुरुवारी 'यळकोट यळकोट जय मल्हार'च्या घोषणेने घटस्थापना करण्यात आली. ८ डिसेंबर रोजी २१०० दीपोत्सवाचा कार्यक्रम हरिश यादव यांच्या हस्ते होणार आहे. ९ डिसेंबरला चंपाषष्टीनिमित्त सकाळी ११ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचे उद्घाटन छत्रपती कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष शेख मंजूर हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे नितीन नाईकनवरे, उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, सुभाष नाकलगावर, पुरुषोत्तम करवा, अनंत जोशी, बाबा देशमाने, रत्नाकर कुलथे, पांडुरंग उगले, राज गायकवाड, दिलीप झगडे, सुधीर नागापुरे, महेंद्र म्हस्के, वैजनाथ घायतिडक, भगीरथ तोडकरी हे उपस्थित राहणार आहे. ९ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता कमलेश जाब्रस यांच्या हस्ते महाआरती होणार आहे. कोरोना नियमांचे पालन करून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

### ओबीसी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत ओबीसींना आरक्षण नाही

▶ प्रतिनिधी


दिल्ली : ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २७ टक्के आरक्षण देता येणार नाही, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. आगामी महापालिका, जिल्हापरिषद, नगर पंचायत निवडणुकांच्या दृष्टीकोनातून ही अत्यंत महत्वाची बातमी आहे. ओबीसींच्या २७ टक्के आरक्षण असलेल्या जागांच्या निवडणुकांवर न्यायालयाने स्थगिती दिली आहे. इतर जागांच्या निवडणुकांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला नसल्याचे न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील आगामी स्थानिक विकास संस्थांच्या निवडणुकांवर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, ओबीसी आरक्षणाबाबत राज्य सरकारच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य सरकारला मोठा धक्का मानला जात आहे.

### ओबीसी आरक्षणासाठी अधिवेशन घ्या : पंकजा मुंडे

मुंबई : ओबीसींची झालेली हानी भयंकर आहे. यात मार्ग निघालाच पाहिजे. विषय राजकारणाचा नाही विषय अस्तित्वाचा आहे. दोषारोप नको मार्ग काढावा, त्यासाठी विशेष अधिवेशन घ्यावे अशी मागणी करणारं ट्विट भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केलं आहे.ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देता येणार नाही, असा स्पष्ट आदेश न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला दिला आहे तसेच राज्य सरकारच्या अध्यादेशाला न्यायालयानं पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे.

# साहित्य विश्वातील सोनेरी पान

**मराठवाडा साहित्य परिषदेने आजपर्यंत विविध संमेलने यशस्वी करून आपले वेगळेपण सिध्द केले आहे. मराठवाडा साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनामुळे साहित्यविश्वात सोनेरी पान जोडले आहे. साहित्य संमेलनाविषयी हिमांशू देशमुख यांनी जवळपास दोन दश कांनी स्मृती जाग्या केल्या. त्यांचा विशेष लेख 'वर्तमान'च्या वाचकांसाठी देत आहोत.**




ग्रामीण भागातील थंडावलेल्या साहित्य चळवळीला गतिमान करण्याचं काम माजलगाव मधील २६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या माध्यमातून २००४ साली झालं. साहित्य संमेलनाकडे फक्त एक कुतूहल म्हणून पाहणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांना साहित्य संमेलनात प्रत्यक्ष सहभागी करून घेऊन नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देणं हा या संमेलनाच्या आयोजना मागील मूळ उद्देश होता जो नक्कीच साध्य झालेला दिसून येतो आहे. २००४ पूर्वी एखाद्या नाट्यगृहात होणाऱ्या मराठवाडा साहित्य संमेलनास अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या उंचीवर नेऊन ठेवण्याचे व एक प्रकारे व्यापक करण्याचे श्रेय माजलगाव येथील दोन दिवसीय २६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे आयोजक नवविकास मंडळ शिक्षण संस्था व तत्कालीन मसाप शाखा, माजलगाव यांना दिले तर नक्कीच ते वावगं ठरणार नाही.

गुलाबी थंडीच्या आल्हाददायक वातावरणात साहित्यिकांच्या मंदियाळीने माजलगाव नगरी दोन दिवस न्हाऊन निघाली.या निमित्ताने माजलगावतीलच नव्हे तर मराठवाड्यातील सांस्कृतिक चळवळीला गतिमान करण्याचं श्रेय साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि मराठवाड्याचे माजी शिक्षक आमदार मा.डी.के.देशमुख सरांच्या कणखर नेतृत्वाला नक्कीच द्यावं लागेल. डिसेंबरच्या थंडीत भल्या पहाटे रांगोळ्यांनी सजलेले शहरातील रस्ते अन वाद्यवृंदासह बैलगाडीतून निघालेल्या ग्रंथदिंडीने तर उपस्थितांच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणेच फेडले. ग्रंथप्रदर्शनाला वाचकांचा मिळालेल्या प्रतिसादाने तर ग्रंथविक्रीचा उच्चांक केला. माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या संमेलनासाठी उदघाटक म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य राम शेवाळकर, ज्येष्ठ विचारवंत गंगाधर पानतावणे यांच्या उपस्थितीने संमेलनाला एका उंचीवर नेऊन ठेवले. मान्यवरांच्या ओघवत्या वाणीने उपस्थित साहित्य रसिकांची मने जिंकली.यानिमित्ताने माजलगावकरांना त्यांचे विचार ऐकण्याची संधीही मिळाली. सलग दोन दिवस विविध चर्चासत्रे, परिसंवाद, कथाकथन, कविसंमेलन, बालमेळावा, चित्रप्रदर्शन, रांगोळी व लोकरंग दर्शन, श्यामची आई एकपात्री नाट्य, धृपदाचे रंग-पखवाजाचे संग, स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत, जिंदादिल मराठी शायरी, मराठी अध्यापक मेळावा आणि प्रगट मुलाखत अशा बहुसंख्य आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांना रसिक प्रेक्षकांचा मिळालेला उदंड प्रतिसाद हा संमेलनाच यश दाखवून देणारा होता. संमेलनाचे प्रमुख कार्यवाह कविवर्य प्रभाकर साळेगावकर यांच्या कल्पक दृष्टीतून या सर्व कार्यक्रमांना विविध साहित्यिकांनी हजेरीही लावली.'केशवराज नगरी' या नावाने उभारलेल्या भव्य सभामंडपात विविध व्यासपीठांना संत, महंत,साहित्यिक,कलावंत,विचारवंत यांची



साहित्यजगत
हिमांशू प्रदिप देशमुख

नावं देऊन त्यांच्या कार्याचे स्मरणही आयोजकांनी यानिमित्ताने ठेवले.तसेच बालमेळाव्याला मिळालेला बालगोलपाळांचा प्रतिसाद तर नक्कीच आनंददायी होता.वाढलेल्या गारठ्यात रात्री उशिरा पर्यत कविवर्य फ.मुं.शिंदेच्या अध्यक्षतेखाली रंगून गेलेलं कविसंमेलन तर अनेकांच्या आजही स्मरणात आहे.

या संमेलनाच आणखी एक वैशिष्ट्य होतं ते संमेलनाची आकर्षक आणि समर्पक 'शिवार' स्मरणिका. या स्मरणिकेच्या माध्यमातून माजलगाव परिसर आणि साहित्य चळवळीची ओळख वाचकांच्या करून दिली गेली. प्रा.ग.प्र.प्रधान सरांच्या शुभेच्छापर पत्र तसेच साहित्यिक,सांस्कृतिक आणि सामाजिक विषयांवरील विविध लेखांच्या माध्यमातून ही स्मरणिका वैविध्यपूर्ण ठरली. संमेलनाच्या समारोपला ज्येष्ठ साहित्यिक केशव मेश्राम यांच्या उपस्थितीने तर कार्यक्रमाची शोभा वाढवली.या संमेलनाच्या स्मरणिकेच्या नावावरूनच काही कालावधी नंतर प्रत्यक्ष शेतात घेतलं जाणार 'शिवार' साहित्य संमेलनाच आयोजन तत्कालीन मसाप शाखेने सुरू केलं ज्याला स्थानिक साहित्यिकांनी उदंड प्रतिसाद दिला आणि ग्रामीण भागात साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने रुजवली जाऊ लागली. आज १७ वर्षांनीही या २६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या आठवणी माजलगावकर रसिकांच्या स्मरणात असून माजलगावच्या सांस्कृतिक चळवळीतील ते 'सोनेरी पान' ठरलं आहे.येत्या काळात पुन्हा एकदा साहित्यिकांची मांदियाळी अनुभवायला मिळावी आणि माजलगावकरांना आदरातिथ्यची संधी मिळावी हीच यानिमित्ताने सदिच्छा.

# बुध्दविहार संस्काराचे केंद्र व्हावे

## आमदार प्रकाश सोळंके यांचे आवाहन; यशोधरा बुद्धविहार वाचनालयाचे भूमिपूजन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बुद्धविहार संस्काराचे केंद्र व्हावे, गौतम बुद्धांनी सांगितलेल्या विज्ञानवादी मार्गावर चालून आपला विकास करावा, असे आवाहन माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. ते यशोधरा बुद्धविहार वाचनालय इमारत बांधकाम भूमिपूजन सोहळ्यात बोलत होते.



माजलगाव शहरातील फुलेनगर येथील बौध्दविहाराच्या दुसऱ्या मजल्यावरील वाचनालय इमारत बांधकामाचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. तथागत भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व सामूहिक त्रिशरण पंचशील घेण्यात आले. या प्रसंगी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे, दयानंद स्वामी, कचरू खळगे, विजय साळवे, श्रीहरी मोरे, अच्युत लाटे, सभापती कल्याण आबुज, जयदत्त नरवडे, सुभाष सोळंके, डॉ.अशोक तिडके, अविनाश जावळे, राजेश घोडे, सुशांत पौळ, दत्ता कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, यशोधरा बुद्धविहार वाचनालय ट्रस्टच्या माध्यमातून अनेक वर्षापासून प्रयत्न करून लोकसहभागातून १९ लक्ष रूपयांचा निधी उभा करून अतिशय कौतुकास्पद काम करण्यात आले, त्याबद्दल प्रथमतः सर्वांचे अभिनंदन केले. यशोधरा बुद्धविहार संस्कार केंद्र बनाव या दृष्टिकोनातून सर्व ट्रस्टी प्रयत्न करतायत, ही अभिमानाची बाब आहे यासाठी चांगले यश मिळावे अशा सदिच्छा यावेळी दिल्या.

कार्यक्रमादरम्यान आवश्यक असलेल्या कामांबद्दल प्रश्न मांडण्यात आले. ते सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी वाचनालयाच्या उर्वरित कामासाठी माझ्या आमदार फंडातून १० लक्ष रूपयांचा निधी दिला जाईल अशीही ग्वाही आमदार सोळंके यांनी दिली. एक चांगले संस्कार केंद्र, इतरांनी आदर्श घ्यावा प्रत्येक गावात अशी संस्कार केंद्र उभा राहिली तर निश्चित येणाऱ्या पिढीला फायदा होईल. प्रत्येक गावात अशी संस्कार केंद्र उभी राहावीत हा आमचा मानस आहेच येत्या काळात यासाठी निधी आणला जाईल शाश्वत विश्वासही आमदार प्रकाश सोळंके यांनी उपस्थितांना दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.लक्ष्मण मस्के यांनी केले तर सूत्रसंचालन यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले. आभार शिवाजी ससाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशोधरा बुद्धविहाराचे अध्यक्ष प्रा.आर.एम.कांबळे यांनी मार्गदर्शन केले. उपाध्यक्ष सुशिलाताई चांदमारे, विश्वस्त उत्तम पायाळ, लिंबाजी वाघमारे, सुंदरराव निसर्गन, प्रा.लक्ष्मण मस्के, सुनिता टाकणखार, कमल डोंगरे, शिवाजी ससाणे, लिंबाजी सोनपसारे यांनी परिश्रम घेतले.



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

तेलगाव/माजलगाव : लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि.सुंदरनगर कार्यालयात राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सचिव सुरेश लगड, अशोक पाटील, विष्णूपंत साबळे, दासराव मोरे, रामदास साखरे, बळीराम निपटे, नागोराव निर्मळ, ज्ञानेश्वर ठोंबरे

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

▶ प्रतिनिधी

बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त परळी शहरात ठिकठिकाणी अभिवादन करण्यात आले. रेल्वे स्थानक परिसरात आंबेडकरी अनुयायां कडुन ध्वजारोहण, बुध्द वंदना, धम्म वंदना, संघ वंदन करुन अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून अनुयायी पानगाव येथील चैत्यभुमीकडे रवाना झाले. दरम्यान, रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी भीम अनुयायानी मोठी गर्दी केली होती. माजलगावात भीमनगर येथे बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# रूपचंद आभारे यांचा वाढदिवस साजरा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील लोकप्रिय तलाठी रूपचंद आभारे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या हस्ते तलाठी आभारे यांचा गौरव करण्यात आला.

तालुक्यातील सोन्नाथडी सज्जा अंतर्गत सोन्नाथडी, गुंजथडी, शुक्लतीर्थ लिमगाव, सुरूमगाव येथे मागील ६ वर्षापासून रूपचंद आभारे हे उत्कृष्ट सेवा देणारे तालुक्यातील तलाठी म्हणून कार्यरत आहेत. तसेच सध्या गंगामसला, मोठीवाडी व छोटीवाडी गावाचा अतिरिक्त कार्यभार आहे. तलाठी रूपचंद आभारे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी सज्जातील गावकऱ्यांतर्फे तलाठी यांनी केलेल्या कामाची परतफेड म्हणून रक्तदान व वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सदर उपक्रम राबविण्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे. कोरोनाच्या काळात गावकऱ्यांना घरपोच दिलेले औषधे पुरवण्याचे काम नोंद घेण्यासारखे आहे. रविवार, दि.०५ डिसेंबर रोजी तलाठी आभारे यांच्या ३४ व्या वाढदिवसानिमित्त झालेल्या रक्तदान शिबीरात ४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच १० वृक्षांची लागवड करण्यात आली.

सदर कार्यक्रमास जय महेश साखर कारखान्याचे उपाध्यक्ष गिरीष लोखंडे, युवा नेते विरेंद्र सोळंके, बालासाहेब जाधव, ड.नारायण गोले पाटील, अशोक नरवडे, पुरुषोत्तम जाधव, सुशिल डक, रंजित जाधव, श्री सिद्धराज अर्बनचे अध्यक्ष अशोकराव सोळंके, मराठावाडा अर्बनचे अध्यक्ष सतिष सावंत, मुक्ताई अर्बनचे अध्यक्ष शिवप्रसाद सक्राते, पंचायत समिती सदस्य मिलिंद लगाडे, सरपंच अंगद कटके, सरपंच अंगद दंडवते, ग्रामसेवक आर.जी.यादव, तालुक्यातील सहकारी तलाठी यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नायबळ तर आभार तलाठी आभारे यांनी मानले. तलाठी आभारे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा झाल्याबद्दल पंचक्रोशीत चर्चा होत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरूमगाव येथील ग्रामस्थांनी मेहनत घेतली.





या कार्यक्रमाचे उद्घाटक सुप्रसिद्ध हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी बोलताना एखाद्या तलाठ्याचा वाढदिवस गावकऱ्यातर्फे विविध कार्यक्रमांनी साजरा होणे हे दुर्मिळ उदाहरण आहे. गावकऱ्यांकडून सन्मान प्राप्त करणारे आभारे हे सर्वोत्कृष्ट तलाठी आहेत. या कार्याक्रमास उपविभागीय अधिकारी निलम बाफना व तहसिलदार वर्षा मनाळे यांनी बोलताना आभारे यांनी यापुढेही असेच काम करावे. तसेच सर्वांनी कोरोना लसीकरण व ई-पिक पाहणी करून घेण्याचे तसेच शेती करतांना तंत्रशुद्ध पद्धत अवलंबवावी असे आवाहन करत पिकाची निवड, पेरणी, काढणी, खत, फवारणी आदिबाबत मार्गदर्शन केले.












आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.